किरकोळ दिवाणी अर्ज नं. १५/२०२२
**CNR No.MHSI01000172-2022**

## <u>निशाणी ३६ खालील आदेश</u>

अर्जदाराने सदरचा अर्ज हा सामनेवाला विरुध्द तुर्तातुर्त ताकीद मागण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जावर सामनेवाला नं. १अ ते १ड यांनी निशाणी १२ वर म्हणणे दाखल करुन विरोध केलेला आहे. अर्जदाराच्या वकीलांना निशाणी ५९ वर लेखी युक्तिवाद दाखल केलेला आहे. सामनेवाला यांच्या वकीलांना निशाणी ६२ वर म्हणणे दाखल करुन विरोध केलेला आहे. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. अर्जदाराचे अर्जामध्ये थोडक्यात कथन की, अर्जदाराने नियमित दावां नं. ३७/१९९४ च्या निकालपत्र व निवाडयाविरुध्द अपिल करण्यासाठी झालेल्या विलंबनासाठी अर्ज केलेला आहे. सदर अर्ज हा त्यांच्या बाजूने होण्याची शाश्वती आहे. मूळ अर्ज चालण्यास बराच कालावधी लागणार आहे. मूळ दावा हा वाटप व तुटककब्जा मिळण्यासाठी दावा मिळकतीबाबत दाखल केला होता. सदर दाव्यामध्ये अर्जदाराचे वडील हजर होते. परंतू त्यांची प्रकृती चांगली नसल्याने ते कागदपत्रे जमवू शकले नाहीत व वकीलांना भेटू शकले नाहीत. त्यामुळे त्यांनी कैफीयत हजर केलेली नाही. सबब, अर्जदार यांच्या वडीलांना रक्तदाब व दम्याचा त्रास असल्याने मुदतीत अपिल दाखल करु शकले नाहीत. त्यामुळे विलंब माफ व्हावा म्हणून अर्ज दाखल केलेला आहे.

३. अर्जदाराचे पुढे कथन की, या अर्जाचे काम चालू असतांना सामनेवाला नं. १ व २ यांनी दावा मिळकतीची साफसफाई करुन घराचे बांधकाम करण्यास सुरुवात केलेली आहे. त्यावेळी अर्जदार यांनी त्यांना हरकत केली असता, त्यांनी अर्जदार यांना जिवे मारण्याची धमकी दिली. सबब, सामनेवाला यांनी नियोजीत घराचे बांधकाम केल्यास अर्जदार यांना कायदेशीर हक्कापासून वंचित रहावे लागेल. त्यांचे अपरिमित असे नुकसान होणारे आहे. त्यामुळे वस्तुस्थितीचा व कायदेशीर विचार करुन सामनेवाला नं. १ व २ यांना दावा मिळकतीमध्ये बांधकाम करु नये अथवा त्या जमिनीवर गहाण, जोखीम निर्माण करु नये म्हणून तुर्तातुर्त ताकीद मागितलेली आहे.

४. सामनेवाला नं. १ व २ यांनी निशाणी ५२ वर अर्जास म्हणणे दाखल करुन विरोध केलेला आहे. सामनेवाला यांनी अर्जदाराचा अर्जातील संपुर्ण मजकूर नाकरलेला आहे. यात सामनेवाला यांचे कथन की, सामनेवाला याने घर बांधण्यासाठी पाया खणण्याचे काम पुर्ण करुन पाया बांधणी केलेली आहे. सामनेवाला याने दावा मिळकतीच्या वाटपाप्रमाणेच स्वतंत्र कब्जे वहिवाटीनुसार घराच्या बांधकामाचे नियोजन केलेले आहे. सदर बांधकामाशी अर्जदार यांचा कोणताही संबंध नाही. सामनेवाला यांना त्रास देण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला असल्यामुळे अर्ज हा खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

५. सामनेवालाचे पुढे कथन की, मूळ दावा हा मंजूर झालेला असून दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप झालेले आहे. सदर निकालाविरुध्द अर्जदाराने नियमित दिवाणी अपिल नं. ५५/१९९९ दाखल केलेले होते. सदर अपिलाचा निकाल दि. २७/०३/२००३ रोजी होऊन अपिल नामंजूर केलेले आहे. त्यानंतर मूळ दाव्याच्या निकालाविरुध्द अर्जदार यांचा पुर्वाधिकारी यांचा हिस्सा ठरलेला आहे. मूळ दाव्याचा निकाल हा गुणदोषावर होऊन वादीच्या पुर्वजांना १/४ हिस्सा मंजूर झालेला आहे. सदर न्यायनिर्णयानुसार दावा मिळकतीचे प्रत्यक्ष तुटक व प्रथम कब्जा झालेला आहे. त्यामुळे पुन्हा त्याच कारणासाठी वाद उपस्थित करता येणार नाही. अर्जदार यांनी सामनेवाला विरुध्द तहसिलदार मालवण ते अप्पर मुख्यसचिव महसूल यांच्याकडे वाटप चुकीचे झाले असल्याबाबत आव्हानीत केले आहे. त्यामध्येही अर्जदाराचा अर्ज हा फेटाळण्यात आलेला आहे. सबब दावा मिळकतीचे वाटप पुर्ण झाले असल्यामुळे सदरचा मूळ अर्ज हा चालण्यास पात्र नाही. सबब, अर्जदाराचे अर्जामध्ये योग्य व संयुक्तिक कारण नाही. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज हा खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

६. अर्जदाराचा अर्ज, त्यावरील सामनेवालाचे म्हणणे उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता, अर्जदाराने सदरचा अर्ज नं. १५/२०२२ हा मूळ दाव्याचे अपिल दाखल करण्यास विलंब झालेला आहे. तो माफ होऊन मिळावा म्हणून दाखल केलेले आहे. सदर विलंब हा जवळजवळ २२ वर्षापेक्षा जास्त आहे. अशा परिस्थीतीमध्ये अर्जदार

व त्यांच्या पुर्वजांना मूळ दाव्यामध्ये १/४ हिस्सा मिळालेला आहे. त्या दाव्याविरुध्द अपिल दाखल केले होते, ते नामंजूर करण्यात आलेले आहे. तसेच महसुल अधिकारी यांच्याकडेही वाटपासंबंधी वाद उपस्थित केलेला आहे, असे कथनावरून दिसून येते. अशा परिस्थितीमध्ये सामनेवालाचे कथन की, दावा मिळकतीचे वाटप पुर्ण झालेले आहे आणि त्यानुसार सामनेवाला हा त्याच्या हिश्याच्या कब्जामध्ये आहे. अशा परिस्थितीमध्ये सामनेवाला यांनी मिळकतीमध्ये घराचे बांधकाम सुरु केलेले आहे. त्यामुळे एकंदरीत अपिलाचा कालावधी, मूळ दाव्याचा झालेला निकाल याचा विचार करता या ठिकाणी तुर्तातुर्त ताकीद अर्ज हा सामनेवाला विरुध्द मंजूर केल्यास त्याने केलेल्या बांधकामाबाबत अपरिमित असे नुकसान होणारे आहे. याउलट तुर्तातुर्त ताकीद मंजूर न केल्यास अर्जदार यांचे सामनेवाला पेक्षा जास्त नुकसान होणार नाही. सदरचा दावा हा वाटपाचा असल्यामुळे गुणदोषावर अर्जदार यांना दावा मिळकतीमध्ये हिस्सा प्राप्त होणार आहे. अशा परिस्थितीमध्ये अर्जदार यांनी सामनेवाला विरुध्द सकृत दर्शनी केस शाबित केलेली नाही. केसचे बलाबल व अपरिमित नुकसान हे सामनेवालाचे बाजूने आहे. त्यामुळे या वरील सर्व कारणांचा विचार करता अर्जदार हे सामनेवाला विरुध्द तुर्तातुर्त ताकीद मिळण्यास अपात्र आहेत. त्यामुळे या व वरील सर्व कारणास्तव मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

अर्जदाराचा निशाणी ३६ वरील अर्ज खर्चासह नामंजूर करणेत येत आहे.

SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Digitally signed by SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Date: 2026.01.16 10:56:30 +0530

सिंधुदुर्ग–ओरोस
दिनांक– १४/०१/२०२६

( श्री.एस.एस.इंदलकर)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
सिंधुदुर्ग–ओरोस.